Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १४ ] गुरुवार ते बुधवार, मे २७-जून २, २०२१/ज्येष्ठ ६-१२, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५४.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो. पांढरकवडा (सु.) कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-२११९.—

ज्याअर्थी, पांढरकवडा नगर परिषदेची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेला आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२७९५-१७५२- प्र. क्र. २८४-१९९५-नवि-१३, दिनांक २ डिसेंबर १९९७ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिलेली आहे) अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १८ मे १९९८ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर सुधारित विकास योजना" असे संबोधिलेली आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये मौजा पांढरकवडा येथील स.नं. १७ (भाग) या जागेवर आरक्षण क्रमांक १३, "बगीचा" क्षेत्रफळ अंदाजे ०.५७ हे. आर (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, पांढरकवडा आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जागेचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा पांढरकवडा येथील स. नं. १७ (भाग), क्षेत्र ५९८४.०० चौ. मी. या जमिनीचे (यापुढे "उक्त जमीन" संबोधिलेले आहे.) संबंधित जमीन मालक श्री. गजानन महादेव शर्मा यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिलेले आहे.) उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक २६-०८-२०१५ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वये सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिलेले आहे.) बजावलेली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजीचे पत्र क्र. १३७१-२०१५ अन्वये, उक्त जमीन संपादन करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केला होता, मात्र उक्त जमीन मालक यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये उक्त सूचना बजाविल्याच्या

दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) मधील तरतुदींनुसार विहीत मुदतीत उक्त जमीन संपादीत केली नाही अथवा उक्त आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधाने कोणतीही पावले उचलेली नाहीत ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन मालकाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १६७२-२०१७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४-०२-२०१८ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्ते यांचे जमिनीवरील आरक्षण क्र. १३ बगीचा हे उक्त अधिकनयमाचे कलम १२७ मधील तरतुदीनुसार व्यपगत झाल्याचे व उक्त जमीन याचिकाकर्त्यांना विकास योजनेतील उक्त जमिनीलगतच्या अनुज्ञेय विकासाच्या प्रयोजनासाठी उपलब्ध होईल, असे घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, पांढरकवडा नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक १७ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार उक्त आरक्षणाच्या भूसंपादनाबाबत २/३ नुकसान भरपाई रक्कमेचा भरणा करण्यात येवू नये म्हणून ठराव सर्वानुमते पारित केलेला आहे व मुख्याधिकारी, पांढरकवडा नगर परिषद यांनी उक्त नमूद मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ रोजीचे आदेशास अनुसरुन सदर आरक्षण व्यपगत होत असल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अंतर्गत आदेश निर्गमित करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ०८ जानेवारी २०२० रोजीचे पत्र क्र. २६६३-२०२० अन्वये सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी २०२१ रोजीचे पत्र क्र. २२५ अन्वये सदर स. क्र. १७, मौ. पांढरकवडा, शिट क्र. २३ मधील ५९८४.०० चौ.मी. जमीन, आरक्षण क्र. १३ बगीचा खालील असल्याची खात्री होत असल्याचे स्पष्ट केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मौजा पांढरकवडा, स.नं. १७ या जमिनीमधील मंजूर अभिन्यासानुसार व भूमी अभिलेख विभागाकडील मिळकत पत्रिकेवरील उत्परिवर्तन नोंदीनुसार उक्त जमीन मालकाची स. नं. १७ या जमिनीमधील ५९८४.०० चौ. मी. क्षेत्राची उक्त जमीन उक्त आरक्षणाने बाधित होत असल्याचे स्पष्ट होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्तिथी पाहता, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त मंजूर सुधारीत विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाज क्षेत्र | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे अंदाजे क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | पांढरकवडा नगर परिषद, मौजा पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ. | आ. क्र. १३ “बगिचा” (०.५७ हे. आर) | स. नं. १७ (भाग) | आ. क्र. १३ चे क्षेत्र ५९८४.०० चौ. मी. (मा. न्यायालयाचे दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ रोजीचे आदेशानुसार) |

**टीप :–** (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

(२) वरील बदल दर्शविणारा मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, पांढरकवडा नगर परिषद, पांढरकवडा, जि. यवतमाळ यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुधाकर नांगनुरे,**
संचालक,
नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ६ मे २०२१.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P.-D.P. Pandharkawda(R)-Sec-127(*2*)-Order-TPV-VI-2119.—

Whereas, the Revised Development Plan of Pandharkawda Municipal Council has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government of Maharashtra, Urban Development Department *vide* its Notification No. TPS-2795-1752-CR-284-1995-UD-13, dated 02 December 1997 (hereinafter referred to as "the said Notification") and the same has came into the force with effect from 18-05-1998 (hereinafter referred to as "the said Sanctioned Revised Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, the land bearing S. No. 17 (Part) of Mouza Pandharkawda is reserved for Site No. 13 "Garden" having an area approximately 0.57 Hect. (hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority is Municipal Council, Pandharkawda (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan came into force;

And whereas, the Land Owner Shri Gajanan Mahadev Sharma (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land under the said reservation in respect of are admeasuring 5984.00 Sq. mt. of S.No.17 (Part) of Mouza Pandharkawda (hereinafter referred to as "the said Land") had served a Notice under Section 127 *(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority which was received them on dated 26-08-2015 ;

And whereas, the said Appropriate Authority has submitted the land acquistion proposal *vide* their letter No. 1371/2015, dated 14-12-2015 to the Collector, but the said land is not acquired or no steps as required under Section 127 *(1)* of the said Act has been taken by the Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice under Section 127 *(1)* of said Act, by the said Appropriate Authority;

And whereas, the Hon'ble High Court of Judicature of Nagpur Bench *vide* its order dated 14-02-2018 in Writ Petition No. 1672 of 2017 filed by the said land owner of the said land in the Hon'ble High Court, has declared that the reservation of the land of petitioner *vide* reservation No. 13 for 'Garden' has lapsed in view of the provisions of Section 127 of the said Act and the petitioner would be free to develop the land as is permissible for the adjacent Land, as per the relevant Development Plan ;

And whereas, Pandharkawads Municipal Council in its General Body Meeting dated 17-02-2018 *vide* its Resolution No. 5 has passed a resolution for non depositing of a payment of 2/3rd amount of compensation for the acquisition of the said reservation and the Chief Officer, Municipal Council, Pandharkawada *vide* letter No. 2663/2020, dated 08-01-2020 has submitted the proposal for issuing order under Section 127 (*2*) of the said Act in respect of the above said Hon'ble High Court's Order dated 14-02-2018 ;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal *vide* letter No. 225, dated 2-2-2021 has clarified that the land bearing S. No. 17 of Mouza Pandharkavada, Sheet No. 23, area admeasuring 5984.00 sq. mt. is affected by the said Reservation.

And whereas, as per the sanctioned layout of the land bearing S. No. 17 of village Pandharkavada & mutation entry on the Property Card of Land Record Department, it is clarified that the said land admeasuring 5984.00 sq. mt. from S. No. 17 of the said land owner is affected by the said reservation;

And whereas, after considering the above facts in respect of the said reservation of the said land in the said Sanctioned Revised Development Plan, theDirector of Town Planning, Maharashtra State, Pune is on the opinion that, it is necessary to issue the order under Section 127 (*2)* of the said Act, regarding the lapsing of the said reservation of the said land ;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 127 (2) of the said Act , in respect of Development Plans of all Municipal Councils /*Nagar Panchayat* and for the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said reservations in respect of the said land under Section 127*(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows ;

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added.—

SCHEDULE

| Sr. No. | Muncipal Council Mauja, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Revised Development Plan & its Approximate Area as per D.P. Repoet | Description of the said Land | Part Approximate Area lapsed from the said Reservation (In Sq. Mt.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Pandharkawda Municipal Council, Mouza Pandharkawda, Taluka Kelapur, Dist. Yavatmal. | Site No.13 “Garden” Area (0.57 hect.) | S.No.17 (Part) | Land of Site No.13, 5984.00 sq.mt. (As per Hon’ble Court Order dated 14-02-2018.) |

*Note* : (1) The said land so released from the said reservtion shall become abailable to the said land owner for the purpose of development as othrwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Revised Development Plan.

(2) A copy of the part plan showing the area which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Pandharkawda during office hours on all working days for inspection to public up to one month.

(2) This Order shall also be published on the Directorate’s official web site *www.dtp.maharashtra.gov.in.*

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharshtra State, Pune.

Pune :
Dated the 6th May 2021.

अ.-एक-अ-२ (१५३८).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.